## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २७.०२.२०१७ ०२.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यान्वारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २६.०२.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे विरगावः—** गुरन I ४५/१७ कलम ३५३ ३३२ ३७९ ५०४ ५०६ १४३ १४७ १४९ भादवि गौण खनिज अधिनियम कलम (१)(२)(३)(४) प्रमाणे नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे जितेंद्र आसाराम चापानेरकर वय ४९ वर्ष व्यवसाय नौकरी तलाठी सज्जा वैजापुर रा. नवजिवन कॉलनी वैजापुर यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) अशोक बबन काळे २) ट्रॅक्टर मालक बंडु शिंदे ३) मनोज ४) दत्तु ५) सागर पुर्ण नाव माहीत नाही सर्व रा. कुलतांबा ता. राहता जि. अहमदनगर तसेच ईतर १५ ते २० लोक गॅन्डर ट्रॅक्टर पळवुन घेवुन जाणारे लोक नाव गाव माहीत नाही यातील फिर्यादी व साक्षीदार हे अवैद्य वाळु वाहतुक करणारे वाहनावर कार्यवाही करण्यासाठी गेले असता यातील आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस धक्काबुक्की केली व शिविगाळ करून शासकीय कामात अडथळा करून पकडलेले वाहन पळवुन घेवुन गेले यातील आ. कं. ०१ यांचे ताब्यातुन १) एक भगव्या रंगाचे स्वराज कंपनीचे मॉडेल नंबर ७४४ एफएफ असे जुने वापरते विनानंबरचे ट्रॅक्टर व विनानंबरची ट्रॉली किमती ५ लाख रूपये अंदाजे २) १८०००/—रू.किं. ६ ब्रास वाळु प्रत्येकी ३०००/—रू. ब्रास प्रमाणे असा एकुण ५ लाख १८ हजार रूपये किमतीचा माल जप्त करण्यात आला म्हणु गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/१०३ मोरे पोस्टे विरगाव हे करीत आहे.

**०२) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन I ८९/१७ कलम ४५४ ३८० भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे संतोष भिमराव कचकुरे वय ३० वर्ष रा. शेंद्रा ता. जि. औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधिल कपाटातील

सोन्याचे दागिने व मोबाईल असा एकुण १ लाख ४७ हजार ५००/—रू.किं. चा मुद्येमाल चोरून घेवुनगेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. लोखंडे पोउपनि पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे.

**०३) पोस्टे सोयगावः—** गुरन । २०/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे महिला फिर्यादी यांनी फिर्याद दिली की मौजे बनोटी अमृतेश्वर मंदीराचे यात्रे मध्ये यातील फिर्यादी व साक्षीदार महिला या यात्रेमध्ये घरगुती सामान विकत घेत असताना त्यांचे गळयातील एकुण १७८५००/—रू.किं. सोन्याचे दागिने ज्यात फिर्यादीचे गळयातील २ ग्रॅमचे मणि मंगळसुत्र व १ ग्रॅम चा ओम व ईतर १६ महिला साक्षीदार यांचे गळयातील ५२ ग्रॅमचे सोन्याचे मणि मंगळसुत्र व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट असे एकुण ५५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुद्याम लबाडीचे इरादयाने चोरून नेले म्हणुन दुरक्षेत्र बनोटी अॅक्रॉस क्रं. ३२/१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जागडे पोउपनि पोस्टे सोयगाव हे करीत आहे म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जागडे पोउपनि पोस्टे सोयगाव हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे पिशोरः—** आ.मृ. नंबर १०/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार प्रविण नामदेव सोळुंके वय ५० वर्ष व्यवसाय पोलीस पाटील रा. नेवपुर खालसा ता. कन्नड यांनी खबर दिली की यातील मयत नामे बाळु पांडुरंग शेळके वय ३५ वर्ष रा. नेवपुर जहॉगिर ता. कन्नड यांना त्याचे राहते घरी ह्रदय विकाराचा झटका आल्याने मरण पावला आहे वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/६८० वाघ पोस्टे पिशोर हे करीत आहे.

**०२) पोस्टे वैजापुरः—** आ.मृ. नंबर १६/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रूग्णालय वैजापुर यांनी खबर दिली की यातील मयत नामे अर्जुन पंढरीनाथ बोराडे वय ५२ वर्ष रा. सिडको औरंगाबाद यांचा दत्तवाडी वैजापुर येथे रोड अपघात झाले वरून त्यांना उपचार कामी हरीष कुमावत यांनी दाखल केले असता सदर ईसम मयत झाला आहे वगैरे एमएलसीवरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जामदार सपोनि पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री पोउपनि कुलकर्णी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण